# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-२०२०/प्र.क्र.१६५/फ-१०

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :०७.१२.२०२०

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर
उपवनसंरक्षक (प्रा.), मध्य चांदा वन विभाग, चंद्रपूर

**विषय** : ग्रीन फिल्ड विमानतळासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील ७५.२४ हे. वनजमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ:** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डेस्क-१७/एनसी/आय/आयडी-३९७/२०-२१, दि.२०.०८.२०२०

महोदय,

ग्रीन फिल्ड विमानतळासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील ७५.२४ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबतचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मला आपणास कळविण्याचे आदेश आहेत की, भारतीय वन्यजीव संस्थेने त्यांच्या अहवालात नमूद केलेले सदरहू जागेचे वन्यजीवांच्या दृष्टीने व विविध कॉरिडॉर जोडण्यासाठी असणारे अनन्यसाधारण महत्व, मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुख्य वनसंरक्षक (प्रा.),चंद्रपूर यांचे अभिप्राय, सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या चंद्रपूर येथील विमानतळाचा होणारा कमी वापर, प्रस्तावित विमानतळाचे चंद्रपूर येथील अस्तित्वातील विमानतळापासूनचे अंतर आणि चंद्रपूरचे नागपूर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळापासूनचे अंतर इ. बाबी विचारात घेऊन, ग्रीन फिल्ड विमानतळासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील ७५.२४ हे. वनजमीन वळती करणे उचित ठरणार नसल्याने सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर न करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे.

07/12/2020

(अरविंद आपटे)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

**प्रत माहितीस्तव:**

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि.